हवामान आधारीत कृषि सल्ला

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

५९) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.२३.०९.२०२२

जिल्हा : अहमदनगर

मागील आठवड्यातील हवामान (१६/०९/२०२२ ते २२/०९/२०२२)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२४/०९/२०२२ ते २८/०९/२०२२)				
१६	१७	१८	१९	२०	२१	२२	दिनांक	२४	२५	२६	२७	२८
५.२	९.४	७.०	४.६	१२.८	६४.२	०.०	पाऊस (मिमी)	१२	८	३	२	५
२९.०	२५.६	३०.०	२७.४	२४.२	२७.०	२९.८	कमाल तापमान (अं.से.)	३०	३०	३१	३२	३१
२२.४	२२.९	२३.३	२१.९	२१.४	२१.९	२२.४	किमान तापमान (अं.से.)	१९	२०	२०	२१	२१
०.६	०.०	०.०	०.६	०.०	०.०	०.०	ढग स्थिती (आकाश)	५	४	३	४	५
९७.०	९३.०	८५.०	९५.०	९६.०	९३.०	८८.०	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%	८९	९०	८९	८८	८७
८९.०	६६.०	७६.०	९२.०	७९.०	६३.०	६३.०	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	५६	५५	५६	५०	५१
४.७	४.९	२.०	३.२	१.१	२.६	१.२	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	१८	१८	१६	१६	१५

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस दिवस आकाश अंशतः ढगाळ राहील तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.
सामान्य सल्ला		१) पावसाळ्यात फवारणी करीताना स्टीकरचा वापर करावा. २) लम्पी या त्वचा रोग नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोट पॉक्स या लसीचे लसीकरण करून घ्यावे.
संदेश		पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.
पशुधन		**"लम्पी त्वचा रोग"** **कारणे** या रोगाचा संसर्ग "कॅप्रीपॉक्स" (Capri pox) विषाणू मुळे होतो. हा विषाणू शेळ्या व मेंढ्यांमधील देवी रोगाच्या विषाणूशी संबंधित आहे. **पशुपालकांनी घ्यावयाची काळजी** बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवणे. कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेशास बंदी करणे. रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित व निरोगी जनावरांना चराऊ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करणे. डास, गोचिड व तत्सम किड्यांच्या बंदोबस्त करणे. तसेच , निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्यासाठी औषध लावणे व गोठ्यामध्ये यासाठीच्या औषधांची फवारणी करणे. रोग प्रादुर्भाव क्षेत्रातील जनावरांना रोग प्रादुर्भाव नसलेल्या ठिकाणी तसेच स्थानिक बाजारांमध्ये नेण्यास प्रतिबंधक करणे. **प्रतिबंधात्मक उपाय योजना** तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करुन घ्यावेत. त्वचेवरील गाठीचे जखमेत रुपांतर झाल्यास जखमेत जंतू पडू नये यासाठी जखमेवर पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनानुसार औषध मलम लावावे. लम्पी या त्वचा रोग नियंत्रणासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने गोट पॉक्स या लसीचे लसीकरण करून घ्यावे.
कापूस	फुले उमलणे ते बोंड धरणे	सततच्या होणाऱ्या पावसामुळे शेतात साचलेले पाणी चर खोदुन काढून टाकावे. तसेच कापूस पिकाचे शेंडे पिवळे पडण्याची शक्यता आहे. वापसा आल्यानंतर पिकास युरिया १५ किलो + म्युरेट ऑफ पोटॅश २५ किलो प्रति हेक्टरी खतांची मात्रा द्यावी. सततच्या पावसाचे शेतात पाणी साचल्यास व जमिनीत वापसा नसल्यास पिकांची मुळे अकार्यक्षम होतात. त्याकरीता उघडीप मिळल्यानंतर खालील फवारण्या कराव्यात. १) १ टक्का मायक्रो ग्रेड II (१०० मिली १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा २) २ टक्के युरिया (२०० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा ३) १.५ टक्के पोटॅशियम नायट्रेट १३:००:४५ (१५० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.
तूर	फांद्या फुटण्याची अवस्था	सततच्या होणाऱ्या पावसामुळे शेतात साचलेले पाणी चर खोदुन काढून टाकावे. सततच्या पावसाचे शेतात पाणी साचल्यास व जमिनीत वापसा नसल्यास पिकांची मुळे अकार्यक्षम होतात. त्याकरीता उघडीप मिळल्यानंतर खालील फवारण्या कराव्यात. १) १ टक्का मायक्रो ग्रेड II (१०० मिली १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा २) २ टक्के युरिया (२०० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा ३) १.५ टक्के पोटॅशियम नायट्रेट १३:००:४५ (१५० ग्रॅम १० लिटर पाण्यामध्ये) दोन वेळा १५ दिवसांच्या अंतराने

हवामान आधारीत कृषि सल्ला

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

		फवारावे.
कांदा		सततच्या होणार्या पावसामुळे कांद्याच्या पाती पिवळ्या पडत असल्यास उघडीप मिळल्यानंतर टेब्युकोनॅझोल १ मिली + स्टिकर प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
फळ पिके		१) आंबा, पेरू, द्राक्ष, मोसंबी व कागदी लिंबू बागेत अतिवृष्टीमुळे पाणी साचले असल्यास त्वरित चर खोदून पाणी बागेबाहेर काढावे. खोडाजवळ पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी , तसेच झाडाच्या खोडास २-३ फूट उंचीपर्यंत बोर्डो पेस्ट (१ कि मोरचूद + १ कि. चुना + १० लि पाणी) लावावे. २) मोसंबी व कागदी लिंबू वरील रस शोषक किडीच्या नियंत्रणासाठी लेकॅनीसिलियम (Verticillium) या जैविक किडनाशकाची ५० ग्रॅम १० लि पाण्यात मिसळून फवारणी करावी. ३) कागदी लिंबू व मोसंबी फळ झाडावरील कोवळ्या पानांवर नागअळी किडीचा प्रादुर्भाव दिसताच स्पिनोसॅड ४५ एसी ४.४ मिली अथवा नोव्हॅलुरॉन १० ईसी ५ मिली अथवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात दोन फवारण्या पंधरा दिवसांच्या अंतराने कराव्यात.
पशुधन		**पावसाळ्यात पशुधन व्यवस्थापन** पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. पावसाळ्यात जनावरांना ओला चारा अति प्रमाणात दिल्यामुळे जनावरांचे पोट फुगते त्यामुळे ओला चारा प्रमाणात द्यावा. पावसाळ्यात मेंढ्यांच्या खुरामध्ये चिखल्या होतात तेव्हा महिन्यातून एकदा कॉपर सल्फेट किंवा फॉरमॅल्डीहाईड द्रावण असलेल्या उथळ हौदातून संपूर्ण खुर बुडतील अशा सोडाव्यात.

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २३.०९.२०२२

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा
प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.